# नाशिक महानगरपालिका, नाशिक

**शालेय पोषण आहार योजनेंतर्गत नागरी भागातील शाळांमध्ये केंद्रिय स्वयंपाकगृह प्रणालीकरीता स्वारस्याची अभिव्यक्ती (Expression of Interest) निविदा प्रारूप वर हरकती मुदतवाढ**

केंद्रीय स्वयंपाकगृह निवड समिती व निविदा दस्ताऐवज तपासणी व छाननी समिती यांनी तयार केलेले शालेय पोषण आहार पुरविणे कामी केंद्रीय स्वयंपाकगृह निविदा प्रारूप दिनांक १४/०४/२०२० रोजी दैनिक लोकमत व दैनिक पुढारी या वर्तमानपत्रातुन प्रसिद्ध करण्यात आलेले होते.

सदर निविदा प्रारूप मनपाच्या www.nmc.gov.in या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आलेले आहे.

निविदेवर काही हरकती असल्यास mdmnmcschoolboard@gmail.com व commissionernmc@gmail.com या ईमेलवर दिनांक २०/०४/२०२० पर्यंत मागविण्यात आलेल्या होत्या, तरी सदर निविदा प्रारूपवर हरकती मागविणे कामी दिनांक ०६/०५/२०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

अतिरिक्त आयुक्त (सेवा)
नाशिक महानगरपालिका, नाशिक

# नाशिक महानगरपालिका, नाशिक

**शालेय पोषण आहार योजनेंतर्गत नागरी भागातील शाळांमध्ये केंद्रिय स्वयंपाकगृह प्रणालीकरीता स्वारस्याची अभिव्यक्ती (Expression of Interest) निविदा प्रारूप वर हरकती बाबत..**

शिक्षण संचालक (प्राथमिक) यांचे पत्र जा.क्र.प्राशिसं/शापोआ/ केंद्रस्वयंपाकगृह/ ईओआय/ २०१९/७१५ दि. १६ मार्च २०१९ यांच्या मार्गदर्शक सुचनानुसार केंद्रीय स्वयंपाकगृह निवड समिती व निविदा दस्ताऐवज तपासणी व छाननी समिती यांनी निविदेचे सन २०२०-२१ प्रारूप तयार केलेले आहे.

सदर निविदा प्रारूप मनपाच्या www.nmc.gov.in या मनपाच्या संकेतस्थळावर जाहिर करण्यात आलेले आहे.

तरी निविदेवर काही हरकती असल्यास mdmnmcschoolboard@gmail.com व commissionernmc@gmail.com या ईमेलवर दिनांक २०/०४/२०२० पर्यंत पाठविण्यात याव्यात.

अतिरिक्त आयुक्त (सेवा)
नाशिक महानगरपालिका, नाशिक

# नाशिक महानगरपालिका, नाशिक

# शालेय पोषण आहार योजनेंतर्गत नागरी भागातील शाळांमध्ये केंद्रिय स्वयंपाकगृह प्रणालीकरीता स्वारस्याची अभिव्यक्ती

# (Expression of Interest)

# निविदा प्रारूप

# केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीबाबत स्वारस्याची अभिव्यक्तीचे प्रारूप

## योजनेची माहिती :

१. केंद्र पुरस्कृत शालेय पोषण आहार योजना राज्यामध्ये दिनांक २ नोव्हेंबर, १९९५ पासून सुरु करण्यात आली आहे.

२. केंद्र व राज्य शासनाच्या ग्रामीण व शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, खाजगी संस्थांच्या अनुदानित व अंशत: अनुदानित शाळा, वस्ती शाळा, महात्मा फुले शिक्षण हमी योजना केंद्र या ठिकाणी इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतचे शिक्षण घेणारे विद्यार्थी शालेय पोषण आहार योजनेचे लाभार्थी आहेत.

३. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दि. १८ जून, २००९ च्या शासन निर्णयानुसार आणि शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडून दि. ०३ ऑगस्ट, २०१८ रोजी उच्चस्तरीय समितीच्या निर्णयानुसार, राज्यातील महानगरपालिका/ नगरपालिका/ नगरपरिषद/कटकमंडळ क्षेत्रातील योजनेच्या पात्र शाळांमधील विद्यार्थ्यांना योजनेंतर्गत शिजवलेल्या गरम आहाराचा (Cooked Food) पुरवठा करण्यासाठी बचत गट/स्वयंसेवी संस्था/अशासकीय संस्थाकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

४. **कामाचे स्वरुप :-**

**(४.१)** शालेय पोषण आहार या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत इ. १ ली ते इ. ५ वी या प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांना **४५० उष्मांक व १२ ग्रॅम** प्रथिनेयुक्त मध्यान्ह भोजन आणि इ . ६ वी ते इ . ८ वी या उच्च प्राथमिक विद्यार्थ्यांना **७०० उष्मांक २० ग्रॅम** प्रथिनेयुक्त मध्यान्ह भोजन पुरविण्यात येते. या योजनेसाठी केंद्र शासनाकडून प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांसाठी प्रति दिन १०० ग्रॅम तांदूळ आणि उच्च प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांसाठी प्रति दिन १५० ग्रॅम तांदुळ मोफत देण्यात येतो. या तांदूळाशिवाय शासनाने विहित केलेल्या प्रमाणानुसार संबंधीत संस्थेने स्वखर्चाने खरेदी करुन अथवा पुरवठेदारामार्फत पुरविण्यात येणारा इतर आवश्यक धान्यादी माल, भाजीपाला इ . घटकांचा आहारात समावेश करुन विद्यार्थ्यांना शिजवलेले अन्न पुरवायचे आहे. शिजविलेल्या अन्नाचे सर्वसाधारणपणे वजन प्रति विद्यार्थी प्राथमिक करीता **४०० ते ४५० ग्रॅम व उच्च प्राथमिक करीता ७०० ते ७५० ग्रॅम** असणे आवश्यक आहे. संबंधित संस्थेस तांदूळाचा पुरवठा शासन स्तरावरुन करण्यात येईल .

**(४.२)** नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्राकरिता स्वारस्याच्या अभिव्यक्ती (Expression Of Interest) अर्ज प्रक्रियेतून पात्र ठरणाऱ्या व सर्वात जास्त गुण मिळालेल्या संस्थाना आहार वाटपाचे काम हे पारदर्शक पध्दतीने संस्थेच्या क्षमतेनुसार विभागून वाटप करण्यात येईल.

**(४.३)** नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रासाठी तयार आहार पुरवठा करणाऱ्या संस्थेने स्वखर्चान खाली नमूद अन्न शिजवण्याकरीता वापरावयाच्या धान्यादी वस्तू व त्याचे प्रति दिन प्रति विद्यार्थी प्रमाण याबाबतच्या तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ.न. | वस्तूचे नाव | प्राथमिक (ग्रॅम मध्ये) | उच्च् प्राथमिक (ग्रॅम मध्ये) |
|---|---|---|---|
| १. | मुगदाळ | २०.०० | ३०.०० |
| २. | मसुरडाळ | २०.०० | ३०.०० |
| ३. | तूर डाळ | २०.०० | ३०.०० |
| ४. | हरभरा | २०.०० | ३०.०० |
| ५. | चवळी | २०.०० | ३०.०० |
| ६. | मटकी | २०.०० | ३०.०० |
| ७. | मुग | २०.०० | ३०.०० |
| ८. | वाटाणा | २०.०० | ३०.०० |
| ९. | फोर्टीफाईड ईडीबल सोयाबील तेल (प्रति लिटर) | ५.०० | ७.५ |
| १०. | कांदा लसून मसाला | ०.३० | ०.४५ |
| ११. | हळद पावडर (ॲग्मार्क) | ०.१५ | ०.२० |
| १२. | डबल फोर्टीफाईड (मीठ) (ॲग्मार्क) | २.०० | ३.०० |
| १३. | जिरे | ०.१० | ०.१५ |
| १४. | मोहरी | ०.१५ | ०.२० |
| १५. | मिरची पावडर (ॲग्मार्क) | ०.३० | ०.४५ |
| १६. | गरम मसाला (ॲग्मार्क) | ०.१० | ०.१० |
| १७. | भाजीपाला | ५० | ७५ |

**(४.४)** शासन निर्णय शालेय शिक्षण व  क्रीडा विभाग दिनांक १८ जून, २००९ व दिनांक ०२ फेब्रुवारी, २०११ मधील परिशिष्टात विहीत करण्यात आलेल्या पाककृतीप्रमाणे तसेच, खाली नमूद केलेल्या पाककृतींपैकी आठवड्यामध्ये विविध पाककृतींचा समावेश असलेला दररोज शिजवलेला ताजा व गरम आहाराचा पुरवठा संस्थेने संबंधित शाळांना करावयाचा आहे. या योजनेमध्ये लाभार्थ्यांना द्यावयाच्या पाककृती शासनामार्फत आवश्यकतेप्रमाणे वेळोवेळी विहित करण्यात आलेल्या आहेत. सदर पाककृतीमधून दिवसनिहाय पाककृती निवड करण्याचे व त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना

राहतील. सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आ हेत.

| अ.क्र. | पाककृती |
|---|---|
| १ | डाळ तांदूळाची खिचडी (मूगदाळ) |
| २ | भात व कडधान्याची उसळ (मटकी) |
| ३ | भात व कडधान्याची उसळ (वाटाणा) |
| ४ | वरण भात (तूरदाळ) |
| ५ | भात व कडधान्याची उसळ (हरभरा) |
| ६ | भात व कडधान्याची उसळ (चवळी) |
| ७ | पुलाव भात |

तसेच आठवड्यातून एकदा नियमित आहारा व्यतिरिक्त एक दिवस पुरक आहार शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग दि. ०२ फेब्रवारी २०११ च्या निर्णयामध्ये नमूद केलेल्या पदार्थांपैकी (खजूर, चिक्की, राजगीरा लाडू, फळे इ.) स्वखर्चाने देणे अनिवार्य राहील.

**प्रत्येक आठवड्याचा पुरक आहार प्रत्येक बुधवारी खालील नियोजनाप्रमाणे द्यावा.**

| दिवस | पुरक आहार पदार्थ | इ. १ ली ते ८ वी प्रमाण (प्रति विद्यार्थी) |
|---|---|---|
| महिन्याचा पहिला बुधवार | फळे स्थानिक उपलब्धतेनुसार (केळी/सफरचंद/मोसंबी/संत्री/चिकू इ.) | किमान १०० ग्रॅम १ नग |
| महिन्याचा दुसरा बुधवार | शेंगदाणा लाडू / चिक्की | किमान वजन ६० ग्रॅम (३० ग्रॅम गुळ व ३० ग्रॅम शेंगदाणे वापरून) |
| महिन्याचा तिसरा बुधवार | राजगिरा / चुरमुरा लाडू | किमान २० ग्रॅम (१ नग मोठी साईज) |
| महिन्याचा चौथा बुधवार | खजूर / खारीक | किमान ५० ग्रॅम (५ नग) |
| महिन्याचा पाचवा बुधवार | फळे स्थानिक उपलब्धतेनुसार (केळी/सफरचंद/मोसंबी/संत्री/चिकू इ.) | किमान १०० ग्रॅम (१ नग) |

जर बुधवारी शाळेला सुटी असेल तर लगतच्या शालेय दिवशी पुरक आहाराचे वाटप करण्यात यावे . वाटप केलेल्या पुरक आहाराचा अहवाल शाळानिहाय महिन्या संपल्यानंतर पुढील महिन्याच्या ५ तारेखपर्यंत संस्थेने संस्था चालक व शाळेच्या मुख्याध्यापकांच्या स्वाक्षरीने मनपा शिक्षण विभागात सादर करावा.

**(४.५)** संबंधित संस्थेने अन्न शिजविताना आवश्यक असलेला भाजीपाला, कोथिंबीर, मिर्ची, टोमॅटो व इतर साहित्याचा स्वखर्चाने वापर करणे अनिवार्य राहील. अन्न शिजवण्याकरीता आवश्यक इंधन स्वखर्चाने वापरणे अनिवार्य राहील. याबाबत कोणतीही वेगळी मागणी ग्राहय धरण्यात येणार नाही.

**(४.६)** शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून मिळणारा तांदूळ हा संस्थांना स्वतंत्र पुरवठेदारामार्फत उपलब्ध करुन देण्यात येईल. उपलब्ध करुन देण्यात आलेला तांदूळ सुस्थितीमध्ये ठेवण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

**(४.७)** संस्थेने स्वत:च्या स्वयंपाकगृहामध्ये अन्न शिजवायचे आहे. शिजलेले अन्न शाळास्तरापर्यंत वाहतूक करून शाळेमध्ये विद्यार्थ्यांना रांगेमध्ये बसवून वाटप करावयाचे आहे. विद्यार्थ्यांनी आहार घेतल्यानंतर त्यांच्या जेवणाची ताटे व इतर भांडी स्वच्छ करणे व परिसर स्वच्छ करणे आदी कामे संबंधित संस्थेस करणे अनिवार्य राहील. याबाबत मनपा अधिकारी/प्राधिकृत कर्मचारी वेळोवेळी आवश्येकतुनुसार तपासणी करतील स्वच्छतेमध्ये त्रुटी आढळल्यास प्रत्येक प्रसंगी रू. १००० (एक हजार) दंड वसुल करण्यात येईल. तयार अन्नाचा पुरवठा शाळापर्यंत करणे, विद्यार्थ्यांना आहाराचे वाटप करणे, भांडी व परिसर स्वच्छ करणे ही सर्व जबाबदारी संबंधित संस्थेशी राहील. शाळा, शिक्षक व विद्यार्थी यांच्यावर याबाबतची कोणतीही जबाबदारी राहणार नाही.

**(४.८)** शिजवलेले अन्न हवाबंद डब्यातून आणि अन्न व औषध प्रशासनाचा अन्न वाहतुकीचा परवाना असलेल्या वाहनातून अन्नाची वाहतूक शाळास्तरापर्यंत करणे अनिवार्य राहील.

**(४.९)** संस्थेस आहार पुरवठ्याच्या कामाचे कंत्राट दिल्याच्या दिनांकापासून पुढील ३ (तीन) शैक्षणिक वर्षाच्या कालावधीत शालेय कामकाज सुरु असणाऱ्या प्रत्येक शालेय दिवशी दैनंदिन तत्वावर संस्थेने शिजवलेल्या आहाराचा पुरवठा शाळेतील विद्यार्थ्यांना करावयाचा आहे.

**(४.१०)** शिजवलेल्या आहाराचा पुरवठा शाळेत पहिली ते आठवीच्या वर्गात उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांना शाळेचे मुख्याध्यापक/ विभाग प्रमुख ठरवतील त्यावेळेत करावयाचा आहे. ज्या शाळेमध्ये दोन सत्रामध्ये वर्ग चालविले जात असतील **अशा शाळेमध्ये पहिल्या व दुसऱ्या सत्रासाठी वेगवेगळया पाककृती देणे आवश्यक राहील.** सकाळच्या सत्रासाठी

सकाळी तयार केलेला आहार आणि दुपारच्या सत्रासाठी दुपारी तयार केलेला आहार असणे आवश्यक आहे. शाळेचे मुख्याध्यापक / विभाग प्रमुख प्रत्येक महिन्याकरीता पटसंख्या व अपेक्षित सरासरी उपस्थिती निश्चित करुन ती माहिती संस्थेस व शिक्षणाधिकारी, मनपा यांना लेखी देतील

**(४.११)** स्वारस्याची अभिव्यक्ती अर्ज प्रक्रियेद्वारे नियुक्त होणाऱ्या संस्थेने प्रति विद्यार्थी प्रति दिन प्राथमिकसाठी ४०० ते ४५० ग्रॅम वजनाचा व उच्च प्राथमिकसाठी ७०० ते ७५० ग्रॅम वजनाचा तयार आहार पुरवठा करणे बंधनकारक राहील. सदर आहार संबंधित संस्थेने MDM PORTAL वरील मिळालेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येवरुन तयार करणे आवश्यक आहे. आहार तयार करण्यासाठी आवश्यक असणारा इतर धान्यादी माल खरेदीबाबत संबंधित संस्थांना खालीलप्रमाणे दोन पर्याय देण्यात येतील.

**पर्याय १ :-**

ज्या संस्थांना स्वखर्चाने धान्यादी माल (उदा. कडधान्य, तेल, मसाला) खरेदी करुन शाळांना विद्यार्थी संख्येनुसार शिजविलेल्या अन्नाचा पुरवठा करावयाचा आहे. अशा संस्थांकडून प्राप्त होणाऱ्या आहाराचे नियमितपणे प्रति दिन आहार पुरवठा करतेवेळी वजन केले जाईल आणि प्रत्यक्षात वजन (डब्याचे वजन वगळून) त्याला ४०० ग्रॅम (प्राथमिकसाठी) / ७०० ग्रॅम (उच्च प्राथमिकसाठी) याच्याशी भागून प्रत्यक्षात किती विद्यार्थ्यांसाठी संस्थेकडून आहार आला आहे, याची परिगणना केली जाईल. अशी परिगणना करुन ज्या शाळेमध्ये फक्त प्राथमिक (इ . १ ली ते ५ वी ) विद्यार्थी शिक्षण घेत आहेत तेथे शिजविलेल्या आहारासाठी रु. १०.९० प्रति किलो व ज्या शाळेमध्ये केवळ उच्च प्राथमिक (इ. ६ वी ते ८ वी ) शिक्षण घेत आहेत अशा शाळांसाठी रु. ९.३० प्रति किलो याप्रमाणे रक्कम देय राहील. ज्या शाळांमध्ये प्राथमिक व उच्च प्राथमिक असे दोनही प्रकारचे वर्ग सुरु आहेत अशा शाळांसाठी शिजविलेल्या आहारासाठी रु. १०.१० प्रति किलो याप्रमाणे देयके अदा केले जातील.

**पर्याय २ :-**

स्वारस्याची अभिव्यक्ती अर्ज प्रक्रियेद्वारे पात्र संस्थांना पुरवठेदाराकडून धान्यादी माल पुरविण्यात येईल . सदर धान्यादी मालाचा वापर करुन अन्न शिजवून देण्यास संस्था इच्छुक असल्यास अशा संस्थाना प्रस्तुत पुरवठेदारामार्फत धान्यादी मालाचा पुरवठा करण्यात येईल. सदर धान्यादी मालाचा वापर करुन संस्थांनी प्राथमिक वर्गासाठी ५० ग्रॅम प्रति विद्यार्थी व उच्च प्राथमिक वर्गासाठी ७५ ग्रॅम प्रति विद्यार्थी याप्रमाणात भाजीपालाचा वापर करुन अन्न शिजवून देणे आवश्यक राहील. यासाठी संबंधित संस्थेस इंधन व भाजीपाला खर्चापोटी प्राथमिक

वर्गासाठी प्रति दिन प्रति विद्यार्थी रु. १.५७ व उच्च प्राथमिक वर्गासाठी प्रति दिन प्रति विद्यार्थी रु. २.३५ याप्रमाणे देयकाची अदायगी करण्यात येईल.

**(४.१२)** संस्थेशी निवड झाल्यानंतर उपरोक्त दोन पर्यायांपैकी एक पर्याय निवडण्याचे स्वातंत्र्य संबंधित संस्थेस राहील. त्याप्रमाणे माहिती महानगरपालिका यांनी संबंधित जिल्ह्यातील शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना देणे आवश्यक राहील. स्विकृत केलेल्या पर्यायानुसार संबंधित संस्थेस देयकाची अदायगी करण्यात येईल. पुरवठा केलेल्या आहाराची रक्कम शाळेच्या व्यवस्थापन समितीच्या बँक खात्यावर जमा करण्यात येईल. शाळा व्यवस्थापन समिती मार्फत संबंधित संस्थेस महिन्यातून किमान एक वेळा देयक अदा करण्यात येईल. शाळा व्यवस्थापन समितीने शासनाकडून देयकापोटी निधी प्राप्त झाल्यानंतर पुढील १० दिवसात संबंधित संस्थेस देयकाची रक्कम अदा करणे बंधनकारक राहील. शालेय व्यवस्थापन समितीमार्फत अन्नाचा पुरवठा करणाऱ्या संस्थेला विहित कालावधीत देयके अदा होत नसतील तर संबंधित शालेय व्यवस्थापन समितीवर कारवाई करण्याचे व देयकांची अदायगी विहित कालावधीत होण्यासाठी पर्यायी व्यवस्था करण्याचे अधिकार शिक्षणाधिकारी, मनपा यांना राहतील.

## ५. **संस्थेच्या पात्रतेबाबतचे निकष :**

**(५.१)** ज्या स्वयंसेवी संस्थेमार्फत धर्म, जात आणि वंश या आधारे कोणताही भेदभाव करण्यात येत नाही किंवा कोणत्याही विशिष्ट धर्माचा प्रचार करण्यात येत नाही. अशी स्वयंसेवी/अशासकीय संस्था योजनेमध्ये भाग घेण्यास पात्र राहील.

**(५.२)** सदर योजनेत भाग घेणारी संस्था ही सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० किंवा संस्था नोंदणी अधिनियम १८६०, सहकारी संस्था अधिनियम १९६०, कंपनी नोंदणी कायदा, अन्वये ना नफा ना तोटा या तत्वावर नोंदणी झालेली कंपनी अथवा आस्थापना किंवा बचतगट या संस्था कोणत्याही अधिनियमाखाली नोंदणीकृत झालेल्या असावीत. सदर **संस्थेची नोदणी ही १ एप्रिल २०१६ पूर्वी झालेली असणे आवश्यक आहे.**

**(५.३)** नाशिक महानगरपालिका, नाशिक मध्ये **किमान २,०००** विद्यार्थ्यांना आहार पुरविण्यासाठी एक युनिट याप्रमाणे अर्ज सादर करणे आवश्यक राहील. तथापि, विद्यार्थी संख्येनुसार युनिट ठरविताना यामध्ये स्थानिक गरजा विचारात घेवून बदल करण्याचे अधिकार आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना राहतील.

**(५.४)** आहार पुरविण्यासाठी संस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम असणे आवश्यक आहे. नाशिक महानगरपालिका क्षेत्रामध्ये अर्ज करणाऱ्या संस्थेची आर्थिक उलाढाल खालीलप्रमाणे असणे आवश्यक आहे. **सदर आर्थिक उलाढाल ही आहार शिजवून त्याचे वाटप करण्यासंदर्भातील असणे आवश्यक आहे.**

| विद्यार्थी संख्या | वार्षिक उलाढाल २०१७-१८ | वार्षिक उलाढाल २०१८-१९ |
|---|---|---|
| २००० | किमान ५ लक्ष | किमान ५ लक्ष |

**(५.५)** संस्थेस शासकीय, निमशासकीय संस्थेस किंवा खाजगी उदा. वस्तीगृहे, जिमखाना, खाजगी कार्यक्रम इ. ठिकाणी अन्न शिजवून पुरवठा केल्याबाबत कामाचा किमान २ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. अनुभव दाखला सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात सादर करावा. याबाबत सक्षम प्राधिकरणाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**(५.६)** संस्थेकडे स्वयंपाकगृहासाठी तसेच गोडाऊनसाठी खालीलप्रमाणे जागा असणे आवश्यक आहे. सदर जागा संस्थेच्या मालकीची किंवा रितसर नोंदणीकृत भाडेतत्त्वावर घेतलेली असणे आवश्यक आहे. भाडेकरार स्वारस्याची अभिव्यक्ती अर्ज करण्यापूर्वीचा असावा. सदरील जागा नाशिक महानगपालिका कार्यक्षेत्राच्या हद्दीमध्ये असणे आवश्यक आहे. तसेच स्वयंपाकगृह व गोडाउन लगत असणे बंधनकारक आहे.

| विद्यार्थी संख्या | स्वयंपाकगृह किमान जागा (Carpert area) चौरस फूट | गोडाउनसाठी किमान जागा (Carpert area) चौरस फूट |
|---|---|---|
| २००० | २०० | २०० |
| ३००० | ३०० | ३०० |
| ४००० | ४०० | ४०० |
| ५००० | ५०० | ५०० |
| ६००० | ६०० | ६०० |
| ७००० | ७०० | ७०० |
| ८००० | ८०० | ८०० |
| ९००० | ९०० | ९०० |
| १०००० | १००० | १००० |

**(५.७)** अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ नुसार संस्थेकडे अन्न शिजविण्याचा परवाना असणे आवश्यक आहे. संस्थेकडे अन्न शिजवण्याच्या प्रक्रियेसाठी आरोग्यदृष्ट्या पात्र असलेला व कोणत्याही संसर्गजन्य रोगापासून मुक्त असलेला पुरेसा कर्मचारी वर्ग असणे बंधनकारक आहे. शासकीय/निमशासकिय वैद्यकिय अधिकाऱ्यांकडून प्रत्येक कर्मचाऱ्याची आरोग्य तपासणी करुन घेणे आवश्यक आहे. सदर कार्यवाही संस्थेची निवड झाल्यानंतर एक महिन्याच्या कालावधीत पूर्ण करण्यात यावी. दरसहा महिन्यातुन एकदा कर्मचारी यांची वैद्यकिय तपासणी करून अहवाल शिक्षणाधिकारी, मनपा यांचेकडे सादर करावा. कर्मचारी बदलल्यास त्याची माहिती त्वरीत शिक्षणाधिकारी, मनपा यांचेकडे सादर करावी. संस्थेकडील याकामासाठी कार्यरत सर्व कर्मचारी यांची यादी (फोटोसहित) संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांना देणे आवश्यक राहील.

**(५.८)** शिजविलेल्या अन्नाची शाळास्तरापर्यंत वाहतूक करण्याकरीता स्वत:च्या मालकीशी अथवा भाडेतत्त्वावरील प्रतियुनिट किमान ०१ बंदिस्त वाहन असणे आवश्यक आहे. सदरील वाहनांना अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ नुसार वाहन परवाना असणे आवश्यक आहे. याबाबतचे स्वयंघोषणा  पत्र व संबधित वाहनांचे आरसी बुक आणि अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ अंतर्गत वाहतूकीचा परवाना नाशिक महानगरपालिका यांच्याकडे छायांकित प्रत उपलब्ध  करुन देणे आवश्यक आहे. तयार आहाराचा पुरवठा अन्न तयार झाल्यापासून जास्तीत जास्त २ तासामध्ये शाळेपर्यंत पोहचणे आवश्यक राहील.  तसेच कार्यादेश दिल्यानंतर वाहन संबंधित संपूर्ण माहिती शिक्षणाधिकारी, मनपा नाशिक यांना सादर करणे बंधनकारक राहील.

**(५.९)** स्वारस्याची अभिव्यक्ती अर्ज प्रक्रियेसाठी संबंधित नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील नोंदणीकृत बचतगट/स्वयंसेवी संस्था/ अशासकीय संस्था अर्ज करण्यास पात्र राहतील.

**(५.१०)** एक व्यक्ती अनेक संस्थांमध्ये पदाधिकारी असल्यास, अशा प्रकरणी कोणत्याही एकाच संस्थेने अर्ज सादर करणे अनिवार्य आहे. सदर अटीचे पालन न करणाऱ्या संस्था निवड करण्यास अपात्र  ठरविण्यात येईल.

**(५.११)** सदरील संस्थेच्याविरुध्द किंवा संस्थेतील पदाधिकाऱ्याविरुध्द कोणत्याही स्वरुपाचा फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा. तसेच, सदरील संस्थेचा काळया यादीत (Black Listed) समावेश झालेला नसावा. किंवा संस्थेला अटी व शर्तींचा भंग केल्याकारणाने Terminate केलेले नसावे.

**(५.१२)** स्वारस्याची अभिव्यक्ती अर्ज प्रक्रीयेतून पात्र ठरलेल्या सर्व संस्थांना आहार वाटपाचे काम मिळण्याच्या दृष्टिने सदर काम विदयार्थी / शाळा संख्येनुसार पारदर्शक पध्दतीने विभागून देण्यात येईल.

## ६. अर्जासोबत सादर करावयाच्या कागदपत्राची यादी

(६.१) संस्थेचे पदाधिकारी व संपर्क अधिकारी यांचे नाव पदनाम, पत्ता, दूरध्वनी क्रमांक इ. बाबतचा तपशील.

(६.२) संस्थेच्या उपविधीची प्रत/विधान पत्राची (Memorandum of Association) ची प्रत

(६.३) संस्था नोंदणी प्रमाणपत्राची प्रत

(६.४) संस्थेच्या कार्याचा अहवाल

(६.५) संस्थेस शासकीय/निमशासकीय कार्यालये, वस्तागृहे किंवा अंगणवाडया यांना आहार पुरवठा करण्यासंदर्भात अनुभव असल्यास त्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सदर प्रमाणपत्रामध्ये अन्न पुरविल्याच्या कालावधी व अन्न पुरवठयाचा एकूण रकमेचा उल्लेख असावा.

(६.६) अग्नि सुरक्षितता प्रमाणपत्राची (Fire Safety Certificate) प्रत

(६.७) अन्न सुरक्षा व मानक अधिनियम २००६ नुसार संस्थेचा अन्न शिजविण्याचा परवाना. ज्या ठिकाणी अन्न शिजविले जाणार आहे त्याच जागेचा परवाना जोडण्यात यावा.

(६.८) शिजविलेल्या अन्नाची शाळास्तरापर्यंत वाहतूक करण्याकरीता स्वत:च्या मालकीची अथवा भाडेतत्त्वावरील प्रतियुनिट किमान ०१ बंदिस्त वाहने असणे आवश्यक आहे. सदरील वाहनांना अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ नुसार वाहन परवाना असणे आवश्यक आहे. याबाबतचे स्वयंघोषणा पत्र व संबधित वाहनांचे आर. सी. बुक व अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ अंतर्गत वाहतुकीचा परवाना व भाडेकरार.

(६.९) गुमास्ता अनुज्ञापत्राची प्रत (Shop Act License)

(६.१०) कोणताही फौजदारी गुन्हा दाखल नसल्याबाबतचे व काळया यादीत समावेश नसल्याबाबतचे (Black Listed ) १०० रु च्या स्टॅम्प पेपरवर ॲफिडेव्हिट

(६.११) संस्थेचे सनदी लेखापाल यांनी प्रमाणित केलेले सन २०१७-१८ व २०१८- १९ या वर्षाचे आर्थिक ताळेबंद

(६.१२) संस्थेकडे स्वयंपाकगृहासाठी तसेच गोडाऊनसाठी आवश्यक असणाऱ्या जागेची कागदपत्रे (जागा स्वत:च्या मालकीची असल्यास) किंवा नोंदणीकृत भाडेकरार (जागा भाडयाची असल्यास) या बाबतची कागदपत्रे

(६.१३) उपरोक्त मुद्दा क्रमांक ५.४ नुसार आर्थिक उलाढालीबाबत सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र

**७.संस्थेची निवड करण्याची कार्यपध्दती :**

(७.१) मुददा क्र. ५ मध्ये नमूद असलेल्या निकषानुसार पात्र असलेल्या संस्थांनी मुददा क्र. ६ मध्ये नमूद करण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांची विहित कालावधीत छाननी करण्यात येईल. तसेच त्यांचे गुणांकन करण्यात येईल.

**गुणांकन तक्ता**

| अ.क्र | गुणदान निकष | |
|---|---|---|
| १. | आर्थिक वर्ष सन २०१७-१८ व २०१८-१९ मधील सरासरी वार्षिक उलाढाल (किमान उलाढाल आवश्यक | कमाल गुण—२० |
| १.१ | २५ लक्ष च्या पुढील | २० |
| १.२ | १६ ते २० लक्ष | १८ |
| १.३ | ११ ते १५ लक्ष | १६ |
| १.४ | ६ ते १० लक्ष | १४ |
| १.५ | ५ लक्ष | १२ |
| २ | शिजविलेल्या अन्नाचा पुरवठा करण्याचा अनुभव | कमाल गुण—२० |
| २.१ | शालेय पोषण आहार योजना | २० |
| २.२ | अंगणवाडी | १८ |

| | | |
|---|---|---|
| २.३ | इतर शासकीय योजना | १६ |
| २.४ | शासकीय/निमशासकीय कार्यालये, शाळा/महाविद्यालये उपहारगृहे इ. | १४ |
| २.५ | इतर खाजगी उपहारगृहे, कार्यक्रम इ. | १० |
| ३ | संस्थेची वर्गवारी | कमाल गुण—२० |
| ३.१ | महिला संस्था अध्यक्षासह सर्व पदाधिकारी महिला असल्यास | २० |
| ३.२ | अध्यक्ष महिला व इतर काही सदस्य महिला असल्यास | १८ |
| ३.३ | चॅरिटेबल ट्रस्ट | १६ |
| ३.४ | सर्वसाधारण सहकारी संस्था | १४ |
| ३.५ | सर्वसाधारण संस्था | १२ |
| ३.६ | यापैकी नाही | १० |
| ४ | स्वयंपाकगृह उभारणे | कमाल गुण—२० |
| ४.१ | स्वत:च्या जागेवर किचनशेड/ गोदाम आहे व स्वयंपाकगृह कार्यान्वित आहे. | २० |
| ४.२ | भाडयाच्या जागेवर किचनशेड/गोदाम उभारले आहे व स्वयंपाकगृह कार्यान्वित आहे. | १६ |
| ४.३ | अन्न शिजविण्यासाठी आवश्यक उपकरणासह किचनशेड/ गोदाम उपलब्ध् आहे परंतू स्वयंपाकगृह कार्यान्वित नाही. | १० |
| ४.४ | किचनशेड/ गोदाम उपलब्ध आहेत परंतू अन्न् शिजविण्यासाठी आवश्यक उपकरणे नाहीत. | ५ |
| ४.५ | यापैकी नाही | ० |
| ५ | अनन सुरक्षा व मानदे अधिनियम, २००६ अन्वये अनन् शिजविण्याचा परवाना | ५ |
| ६ | वाहनास FDA अन्न वाहतुकीचा परवाना | ५ |
| ७ | स्वयंपाकगृहास ISO प्रमाणपत्र असल्यास | ५ |
| ८ | सर्व लेखे सनदी लेखापालामार्फत प्रमाणित केली असल्यास | ५ |
| | एकूण गुण | १०० |

(७.२) पात्र झालेल्या संस्थांमधून केंद्रीय स्वयंपाकगृहाच्या निश्चित झालेल्या युनीट संख्ये इतक्या प्रमाणात सर्वाधिक गुणानुक्रमानुसार संस्थांची निवड करण्यात येईल. निवड झालेल्या संस्थांना आहार वाटपाचे काम विद्यार्थी / शाळा संख्येनुसार पारदर्शक पध्दतीने विभागून देण्यात येईल. समान गुण प्राप्त् झाल्यास नोंदणीकृत बचतगटांना प्राधान्य देण्यात येईल

## ८. सर्वसाधारण अटी व शर्ती :-

(८.१) सदर संस्थेने शिजविलेल्या आहाराचा पुरवठा करण्यासंदर्भात द्यावयाची वार्षिक पुरवठयाच्या ३% अनामत रक्कम या व्यतिरिक्त शासनाच्या तांदुळासाठी स्वतंत्र सुरक्षा अनामत रकम सादर करणे आवश्यक आहे. तांदळासाठीची सुरक्षा अनामत रक्कम रु. २.०० लक्ष प्रति युनिट याप्रमाणे राष्ट्रीयकृत/ शेड्युल्ड बँक यांचेकडून काढण्यात आलेल्या Raiya Samanvay Adhikari, Shaley Poshan Aahar Kaksh, Maharashtra Rajya, Pune. यांच्या नावे असलेल्या धनाकर्षाव्दारे (Demand Draft) भरण्यात यावी. सदर जमा सुरक्षा रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

(८.२) शालेय पोषण आहार योजनेसाठी केंद्र शासनाकडून मिळणारा मोफत तांदूळ स्वतंत्रपणे नियुक्त केलेल्या कंत्राटदारामार्फत संस्थेस उपलब्ध करुन देण्यात येईल. सदर तांदळाची संस्थेने स्वत:च्या गोदामात आवश्यक सर्व उपाययोजना करुन साठवणूक करणे आवश्यक राहील. पुरवठादार संस्थेस तांदूळाव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारच्या वस्तु, भांडी किंवा पूरक पदार्थ शासनाकडून पुरविले जाणार नाही.

(८.४) पुरवठादार संस्थेने आहाराची वाहतूक करणाऱ्या वाहनात प्रमाणित इलेक्ट्रॉनिक वजन काटा ठेवला पाहिजे. वजन काटा वैद्य मापन विभागाकडून दर सहा महिन्यांनी प्रमाणित करून तसा अहवाल शिक्षणाधिकारी, मनपा नाशिक यांचेकडे सादर केला पाहिजे. प्रत्यक्ष आहार मुख्याध्यापक व मुख्याध्यापकांनी प्राधिकृत केलेला उपशिक्षक यांचेसमोर दररोज वजन करुन दिला पाहिजे तसेच दैनंदिन पुरवठा केल्याची शाळेची पोहोच घेणे आवश्यक राहील.

(८.५) नियोजित पुरवठादार संस्थेस नेमून दिलेल्या शाळांमध्ये, आहार पुरवठयाचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्याकडे अधिकृत ओळखपत्र फोटोसहित असणे आवश्यक आहे. सदर कर्मचाऱ्याची माहिती पुरवठादार संस्थेने शिक्षणाधिकारी, मनपा नाशिक यांचेकडे देणे बंधनकारक राहील.

(८.६) शालेय पोषण आहार योजनेसंदर्भात केंद्र शासन व राज्य शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांची / नियमांची अंमलबजावणी पुरवठादार संस्थेने करणे अनिवार्य राहील.

(८.७) पुरवठादार संस्थेचे स्वयंपाकगृह, गोदाम, संस्थेतील सर्व लेखी नोंदवह्या तसेच अशा वाहनाची शासकीय अधिकारी तसेच मनपा अधिकारी तपासणी करतील, त्यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना संपूर्ण सहकार्य करण्याची संस्थेची जबाबदारी राहील.

(८.८) शाळेमध्ये शिजविलेले अन्न पोहोच करणे तसेच सदर अन्नाचे विद्यार्थ्यांना वाटप करणे त्याप्रमाणे शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांच्या दि. ०२/०२/२०११ निर्णयामध्ये स्वयंपाकी तथा मदतनीसाच्या कामासाठी विहित केलेल्या जबाबदाऱ्या संस्थेच्या राहतील.

(८.९) स्वारस्याची अभिव्यक्तीसाठी संस्थेने करावयाच्या अर्जाची किंमत रु. ५०००/- इतकी राहील.

(८.१०) अर्जदार संस्थेने सादर केलेल्या सर्व कागदपत्रातील प्रत्येक कागदपत्र नोटरी करुन सादर करणे अनिवार्य राहील.

(८.११) शालेय पोषण आहार योजनेअंर्तगत आहार पुरवठा करण्यासाठी मागविण्यात आलेले स्वारस्याची अभिव्यक्ती (EOI) अर्ज कुठलेही लेखी अथवा तोंडी कारण न देता कोणत्याही टप्प्यावर स्विकृत करणे, नाकारणे किंवा रद्द करणे याबाबत सर्व अधिकार आयुक्त, नाशिक महानगरपालिकेस राहतील.

(८.१२) शालेय पोषण आहार योजनेअतंर्गत शिजवलेला आहार पुरवठा करण्यासंदर्भात संस्थेबरोबर करावयाचा करारनामा /Agreement हा ३ (तीन) वर्षासाठी करण्यात येईल.

(८.१३) संस्थेस नेमून देण्यात येणारी शाळा व विद्यार्थी संख्या यामध्ये बदल करण्याचा अधिकार आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना राहील.

(८.१४) किमान दोन महिन्यामध्ये एकदा कच्चा माल व तयार आहाराची तपासणी करण्यासाठी आहाराचे नमूने नियुक्त करण्यात येणाऱ्या संस्थेच्या खर्चाने शासकीय प्रयोगशाळेमध्ये अथवा शासनमान्य खाजगी नाशिक शहारातील प्रयोगशाळेमध्ये पृथ:करणासाठी पाठविण्यात यावे तसेच कच्चा माल व तयार आहाराचा नमूना ज्या दिवशी ज्या संस्था/शाळांमधून उचलावयाचा आहे त्यांची निवड संबंधित जिल्हयातील शिक्षणाधिकारी (प्राथ.)/शिक्षणाधिकारी, मनपा किंवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी यांनी करावी. तसेच नमून्यांची संख्या देखील शिक्षणाधिकारी यांनी निश्चित करावी.

(८.१५) आहाराचा पुरवठा करताना संस्थेस कोणतेही कर दयावे लागल्यास त्याचा भरणा संस्थेने स्वतः  करणे आवश्यक राहील. तसेच तयार आहाराच्या वाहतुकीच्या दरम्यान अपघात झाल्यास अपघातग्रस्तास भरपाई देण्याची जबाबदारी संस्थेवर राहील.

(८.१६) संस्था त्यांनी केलेल्या आहार पुरवठ्याच्या कामाचे मासिक शाळानिहाय अहवाल (वजनासह) विहित नमुन्यात शिक्षणाधिकारी, मनपा शिक्षण विभाग यांना वेळोवळी सादर करील. अहवाल सादर करतांना संस्था चालक व शाळेचे मुख्याध्यापक संयुक्त स्वाक्षरीने सादर करतील. शाळेत पुरविल्या जाणाऱ्या आहाराच्या दैनंदिन नोंदी विहित नमुन्यात घेण्यात याव्यात. नोंदवहित शाळेचे मुख्याध्यापक व माल पुरवठा करणारे संस्थेचे कर्मचारी यांची दररोज स्वाक्षरी घेण्यात यावी. संस्था चालकांकडून मासिक अहवाल विहित मुदतीत प्राप्त न झाल्यास देयक अदा केले जाणार नाही.

संस्थेने केलेल्या आहार पुरवठयाचे देयक वेळोवेळी शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधी नुसार राज्यस्तरावरुन थेटपणे शाळा व्यवस्थापन समितीच्या बैंक खात्यामध्ये जमा करुन शाळांमार्फत अदा केले जाईल. काही तांत्रिक अडचणी व अपरिहार्य कारणामुळे देयकाच्या अदायगीस विलंब झाल्यास कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई दिली जाणार नाही. ही अट अर्ज सादर करताना संस्थेस मान्य करणे आवश्यक आहे .

(८.१७) आहार पुरवठयाचे काम पुरवठादार संस्थेस स्वतः करावे लागेल. त्याकरीता उपकंत्राटदार नेमता येणार नाही. संस्था त्यांना नेमून दिलेले काम उपकंत्राटदार नेमून करत असल्याचे आढळून आल्यास संस्थेस देण्यात आलेला कामाचा ठेका रद्द करण्यात येईल.

(८.१८) आहार शिजवण्यासाठी हळद, मिरची पावडर, कांदा लसुन मसाला व गरम मसाला हया ब्रँडेड व ॲगमार्क असलेल्या वापरणे अनिवार्य राहील. तसेच  फोर्टिफाईड सोयाबीन खादयतेल व  डबल फोर्टिफाइड मीठ वापरणे अनिवार्य राहील.

(८.१९) शासनाने  निश्चित केलेल्या पाककृतीप्रमाणे व शाळेने ठरविलेल्या वेळापत्रकाप्रमाणे तयार आहाराची वाहतूक ही हवाबंद डब्यातून व बंदिस्त वाहनातून संबंधित शाळेपर्यंत करावी लागेल.

(८.२०) पुरवठादार संस्थेमार्फत पुरवठा करण्यात आलेल्या आहाराची चव संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाकडून किंवा नेमलेल्या शिक्षक यांचेकडून घेण्यात येईल. त्यानंतर त्या आहाराचे

विद्यार्थ्यांना वाटप करण्यात येईल. आहार खाण्यात अयोग्य असल्यास तो स्विकारली जाणार नाही. दैनंदिन चव नोंदवही संस्थेने विहित नमुन्यात शाळानिहाय अदयायावत ठेवावी.

(८.२१) निकृष्ट दर्जाचा आहार पुरविल्यामुळे/उशिरा आहार पुरविल्यामुळे किंवा अन्य कारणास्तव पुरवठादार संस्थेस दंड आकारण्यात आल्यास, दंडाच्या रकमेची वसूली प्रथम त्यांच्या देयकामधून करण्यात येईल व दंडाची रक्कम देयकापेक्षा अधिक झाल्यास त्यांची वसूली सुरक्षा अनामत रकमेतून करण्यात येईल. दंडाची रक्कम प्रति दिन प्रति शाळा २००० रूपये इतकी आकारण्यात येईल.

(८.२२) आहार पुरवठ्याबाबत कोणतीही गैरघटना घडल्यास त्यास संबंधित संस्था सर्वस्वी जबाबदार राहील. तसेच संस्थेने पुरवठा केलेल्या आहारामुळे विषबाधेची घटना घडल्यास अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ अतंर्गत नियमानुसार संस्था कारवाईस पात्र ठरेल.

(८.२३) संस्था आहार पुरवठा करण्याचे काम करण्यात अथवा अटी शर्तीचे पालन करण्यात असमर्थ/अयशस्वी ठरल्यास त्यांचे काम कोणत्याही प्रकारची लेखी स्वरुपात पूर्वसूचना न देता रद्द करण्याचा अथवा त्या कामाकरीता अन्य पुरवठादार संस्था नियुक्त करण्याचा अधिकार आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांचा राहील.

(८.२४) स्वयंपाकगृहाचे स्थळ/ठिकाण अर्जामध्ये कळविल्याप्रमाणे त्याच ठिकाणी असणे आवश्यक आहे. गोडावून / स्वयंपाकगृह यांची तपासणी वेळोवेळी नाशिक महानगरपालिका / शासनामार्फत करण्यात येईल.

(८.२५) स्वयंपाकगृह व स्वयंपाकासाठी आवश्यक असणारा तांदूळ व धान्यादी माल ठेवण्याची जागा ( कोठीघर/Store room/Godown) स्वतंत्र असावी.

(८.२६) तांदूळ व धान्यादी माल ठेवण्याची जागा (कोठीघर/ Store room/Godown ) दररोजचे आहार पुरवठाविषयक कामकाज पूर्ण झाल्यानंतर, सीलबंद करणे आवश्यक आहे. तसेच शालेय पोषण आहार योजनेसाठी वापरलेला तांदूळ व धान्यादी माल यांच्या नोंदवह्या दररोज अध्यावत ठेवाव्यात .

(८.२७) पुरवठादार संस्थेमार्फत पुरवठा करण्यात आलेल्या आहारात तपासणीमध्ये प्रथिने व उष्मांक विहीत परिमाणापेक्षा कमी आढळून आल्यास त्या दिवशी त्या संस्थेने पुरवठा केलेल्या

सर्व शाळांतील आहाराची देयके अदा केली जाणार नाही. तथापि, सतत तीन पेक्षा जास्त वेळा आहारातील प्रथिने व उष्मांकाचे प्रमाण कमी आढळून आल्यास अशा पुरवठधारकाचे काम कोणतीही पूर्व सूचना न देता पूर्णपणे रदद करण्याचे व पुरवठादार संस्थेला काळ्या यादीत टाकण्याचे अधिकार आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना राहील.

(८.२८) पुरवठा करण्यात आलेल्या आहारामुळे विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्यास, संबंधित पुरवठादाराविरुध्द विरुद्ध योग्य ती फौजदारी कारवाई करण्यात येईल. त्याचप्रमाणे संस्थेने त्या दिवशी आहार पुरवठा केलेली सर्व शाळांतील सर्व विद्यार्थ्यासाठीची देयके अदा करण्यात येणार नाहीत. विषबाधा झालेल्या तत्कालीन परिस्थितीचा विचार करुन पुरवठादारास सर्व वैद्यकीय खर्च करावा लागेल. जिवित हानी झाल्यास संपूर्ण जबाबदारी पुरवठादाराची राहिल. अशा संस्थेचे काम कोणतीही पूर्व सूचना न देता रद्द करण्यात येईल.

(८.२९) या पुरवठादार संस्थेमार्फत पुरविण्यात येणारा आहार ज्या दिवशी भेसळयुक्त असल्याचे आढळून आल्यास त्या दिवसाचा पुरवठा केलेल्या आहाराची देयके अदा करण्यात येणार नाहीत. आहारामध्ये भेसळ करणे ही बाब गांभीर्यपूर्वक विचारात घेवून अन्न व भेसळ प्रतिबंध कायद्याखाली संस्था कारवाईस पात्र राहील. तयार अन्न पुरविणाऱ्या संस्थेला खालील नमूद कारणकरिता त्या दिवसाचे देयक अदा न करण्याचा अधिकार आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना राहील.

१) विषबाधा झाल्यास

२) प्रयोग शाळा तपासणी अहवालामध्ये नमूने असमाधानकारक आढळल्यास

३) धान्यामध्ये भेसळ आढळल्यास

४) धान्य निकृष्ट दर्जाचे आढळल्यास

५) आवश्यक प्रथिने व उष्मांक अन्नामध्ये न आढळल्यास

९. उपरोक्त नियमावलीतील अनुक्रमांक ५ मध्ये शासनाने प्रति युनिटसाठी किमान विद्यार्थी संख्या, त्यानुसार गोडावून व स्वयंपाकगृहासाठी आवश्यक जागा, आर्थिक उलाढाल इत्यादी बाबी निश्चित केल्या आहेत. सदर अटी व शर्ती यामध्ये स्थानिक परिस्थिती विचारात घेऊन बदल करण्याचे अधिकार आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना राहील.

१०. खोटी माहिती/कागदपत्रे सादर केल्यास कायेदशिर कारवाई करण्यात येईल तसेच अनामत रक्क्म (८.१ मधील नमूद) जप्त करण्यात येईल.

११. अचानक पोषण आहार बंद केल्यास त्यापोटी होणाऱ्या जादा खर्चास ठेकेदार जबाबदार राहील व जादा खर्च होणारी रक्क्म ठेकेदाराकडून वसुल करण्यात येईल.

१२. मुददा क्र. ४.३ व ४.४ यात वेळोवेळी बदल करण्याचा अधिकार आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक व समितीस राखून ठेवलेले आहे.

१३. केंद्रीय स्वयंपाकगृह बाबतीत कायदेशिर बाब निर्माण झाल्यास त्याबाबतचे निराकरणेसाठी आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक मनपा हे सक्षम प्राधिकरण असतील.

१४. वरील सर्व बाबीं व्यक्तिरिक्त समितीच्या वतीने शालेय पोषण आहारातील बदला संबधित सांगण्यात येणाऱ्या इतर बाबींची पूर्तता करून देणे ठेकेदारास बंधनकारक राहील.

१५. केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणाली अंतर्गत शालेय पोषण आहार पुरविणारे ज्या संस्थांचा ठेका नाशिक मनपाने विखंडित (Terminate) केला आहे त्यांना स्वारस्याची स्वारस्याची अभिव्यक्ती (EOI) मध्ये भाग घेता येणार नाही.

१६. स्वारस्याची अभिव्यक्ती (EOI) व्दारे पात्र झालेल्या संस्थाना नाशिक महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये कुठेही काम करणे बंधनकारक राहील.

(श्रीमती अर्चना तांबे)
प्र.शिक्षणाधिकारी तथा सचिव
निविदा दस्ताऐवज तपासणी व छानननी
समिती

(बोधीकिरण सोनकांबळे)
लेखापरिक्षक तथा सदस्य
निविदा दस्ताऐवज तपासणी व छानननी
समिती

(गुलाब गावित)
मुख्य वित्त व लेखा अधिकारी तथा सदस्य
निविदा दस्ताऐवज तपासणी व छानननी
समिती

(मनोज घोडेपाटील)
उपायुक्त (प्र.) तथा सदस्य
निविदा दस्ताऐवज तपासणी व छानननी
समिती

(संदिप नलावडे)
अधिक्षक अभियंता, पाणीपुरवठा व मलनि:स्सारण तथा
अध्यक्ष
निविदा दस्ताऐवज तपासणी व छानननी समिती